Bharatiya Jain Sanghatana

Bharatiya Jain Sanghatana

# Sujalam Suphalam

## Osmanabad

District-wide Water Resource Development Program











# ANNUAL REPORT

## 2018-19

# Foreword



**Shri Radhakrishna Game, IAS**
*Former District Collector, Osmanabad*



नाशिक महानग...
राजीव गांधी भवन, ...
नाशिक ४२२ ००२
: ०२५३- २५७८२०६ (कार्या.)
: commissionernmc@gmail.com
mcoffice@nmc.gov.in

राधाकृष्ण गमे भा.प्र.से.
आयुक्त

## महाराष्ट्र दुष्काळमुक्त अभियान
### "सुजलाम सुफलाम उस्मानाबाद"

**सुजलाम सुफलाम योजने पूर्वीची जलसंधारण कामाची गरज :-**

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत महाराष्ट्राने अनेक दुष्काळ पाहिले आहेत. सन १९७२ च्या दुष्काळात काही पिकले नव्हते पण पिण्याकरिता पाणी होते. उस्मानाबाद जिल्ह्यात मागील २ वर्षे कमी पडलेल्या पावसाने भूजल पातळी खालावलेली आणि त्यातच या वर्षी खूपच कमी पाऊस झाल्याने, या वर्षीच्या दुष्काळाची तीव्रता १९७२ च्या दुष्काळा पेक्षा हि भीषण आहे.

गेल्या काही वर्षांपासून पावसाचा स्वभाव बदलला आहे. तो उशीरा सुरू होतो, लवकर संपतो, पावसाचे दिवस कमी होत चालले आहेत, पावसाच्या प्रमाणात मात्र म्हणावा तसा फरक पडलेला नाही व म्हणूनच पावसाचा वेग खूपच वाढला आहे ही या नवीन पाऊस पध्दतीची वैशिष्ट्ये आहेत. वेगाने पडणारा पाऊस पाणी जमिनीत मुरण्याच प्रतिबंध करतो, तो वेगाने पडतो व वेगाने वाहून जातो.

कमी पावसामुळे व पाण्याच्या अपव्ययामुळे अनेक गावात तीव्र पाणी टंचाई आहे या वर्षी महाराष्ट्र शासनाने एकूण १५१ तालुके, २६८ मंडळे, व ९३१ गावे दुष्काळी म्हणून जाहीर केले आहे. महाराष्ट्रातील एकुण तालुक्यांच विचार करण निम्मा महाराष्ट्र या वर्षी दुष्काळाच्या छायेखाली आहे पातून महाराष्ट्र विशेषतः मराठवाड्यातील उस्मानाबाद सारख्या जिल्ह्यास बाहेर काढावयाचे असल्यास विविध प्रकारचे जलसंधारण उपचाराद्वारे पाणी साठवण क्षमता वाढविणे अत्यंत आवश्यक आहेच पण त्याच बरोबर लोकांमध्ये पाणी वापराबाबत जागृती करणे हेहि तितकेच महत्वाचे आहे.

**आराखडा व नियोजन :-**

महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या मध्ये झालेल्या दिनांक. २५ जुन २०१८ रोजीच्या सामंजस्य करारानुसार दुष्काळमुक्त महाराष्ट्र अभियान राज्यातील बुलढाणा, अकोला, वाशिम, लातूर व उस्मानाबाद या एकूण पाच जिल्ह्यात दुष्काळ निवरणाचे कार्य सुरू झाले. सुजलाम सुफलाम उस्मानाबाद अभियानातर्गत जलसंधारण विभाग , लघु पाटबंधारे ( जिल्हा परिषद) , कृषि, जलसंपदा, वन व सामाजिक वनीकरण या विभागाद्वारे खालीलप्रमाणे कामनिहाय आराखडा तयार करण्यात आला यामध्ये , नालाखोलीकरण, तलावातील गाळ काढणे, सलग समतल चर, शेततळे, वनतळे, शेतीतील बांध बंधिस्ती या प्रकारची उपचार कामे प्रस्तावित करण्यात आली.

# Foreword

**Shri Radhakrishna Game, IAS**
*Former District Collector, Osmanabad*



नाशिक महानगरपालिका
राजीव गांधी भवन, शरणपूर रोड
नाशिक ४२२ ००२
: ०२५३- २५७८२०६ (कार्या.)
: commissionernmc@gmail.com
mcoffice@nmc.gov.in

राधाकृष्ण गमे भा.प्र.से.
आयुक्त

**तालुकास्तरीय समिती :**

तालुका स्तरीय नियोजन व यशस्वी अमलबजावणी करण्याच्या उद्देशाने तालुकास्तरावर उपविभागीय दंडाधिकारी, तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी, गट विकास अधिकारी व संबंधित कार्यकारी यंत्रणांचे अधिकारी यांची संयुक्त समिति स्थापन करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून तालुक्यातील कामांचे नियोजन करणे, कामाचा प्राधान्यक्रम ठरविणे, नवीन कामास सुरुवात करणे, कामांच्या प्रगतिपथावर देखरेख ठेवणे, डिझेल वितरण गरजेनुसार होऊन मशीन विना काम बंद राहणार नाहीत याची दक्षता घेणे इत्यादि बाबी वर विशेष लक्ष्य केंद्रित करण्यात आले.

**साप्ताहिक आढावा बैठक :**

कोणत्याही योजनेच्या यशस्वी अमलबजावणी करण्याकरिता सर्वात महत्वाची बाब म्हणजे नियमित आढावा व त्यानुसार वेळोवेळी देण्यात येणारे निर्देश. मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आठवड्याच्या दर मंगळवारी होणारी साप्ताहिक बैठकीच्या माध्यमातून प्रत्येक कार्यकारी यंत्रणेचा झालेल्या कामाचा प्रगति व नियोजन यांद्वारे प्रत्येक काम यशस्वीपाने पूर्ण होण्यास मदत झाली.

**फलनिष्पती :**

दि. ०५ ऑक्टोबर २०१८ ते २१ फेब्रुवारी २०१९ या कलावधीत बीजेएस मार्फत २८ जेसीबी व २४ पोकलेण अश्या एकूण ५२ मशीन कार्यरत होत्या त्याद्वारे सर्व विभागाचे मिळून २५४ कामे पूर्ण करण्यात आली आहेत, सदर कामे करण्यासाठी ५५, ७३० इतके मशीन तास काम करण्यात आले त्यावर शासनामार्फत इंधनापोटी ३४८. २१ लक्ष इतका निधि खर्च करण्यात आला. त्याद्वारे १३८९. ५१ TCM एवढा पाणी साठा निर्माण झाला.

दि. १९ फेब्रुवारी २०१९ रोजी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, उस्मानाबाद जिल्ह्यास भारतीय जैन संघटनेने उपलब्ध करून दिलेल्या मशीनच्या भाड्यासाठी रक्कम रु. ४ कोटी उपलब्ध करून दिले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता दि. १० मार्च २०१९ रोजी लागू झाल्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्राप्त झालेल्या रकमेतून नव्याने भाडेतत्वावर लावण्यात येणाऱ्या मशीनचा करारनामा करता आला नाही तसेच नवीन कोणतेही काम हाती घेता येवू शकत नव्हते त्यामुळे साधारण ४५ दिवसाच्या कालावधीत काम करता आले नाही.

दुष्काळ निवारण कामासाठी दि. ०६ मे २०१९ पासून आदर्श आचारसंहिता शिथिल झाल्यानंतर दि. ०८ मे २०१९ रोजी नवीन मशीन भाडेतत्वावर घेण्यासाठी करारनामा करण्यात आला, त्यानंतर मशीन प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर उतरविण्यात येवून ५२ पोकलेन व ०१ जेसीबी मशीन विविध यंत्रणेच्या कामावर कार्यरत होत्या. त्याद्वारे २०७.८८ TCM एवढा पाणी साठा निर्माण झाला आहे.

**"आता पर्यंत सुजलाम सुफलाम महाराष्ट्र योजनेअंतर्गत जिल्ह्यामध्ये एकूण ४२५ कामे पूर्ण झालेली असून ५३ कामे प्रगतिपथावर आहेत, त्याद्वारे ४०८८.४३ TCM एवढा पाणीसाठा निर्माण झाला असून १६३५ हेक्टर संरक्षित सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे."**

11-07-19

# Foreword

**Smt. Deepa Mudhol Munde, IAS**
*District Collector, Osmanabad*





दिपा मुधोळ मुंडे
भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी

महाराष्ट्र
शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद
☎ का. ०२४७२-२२४५०१ / नि. २२४६०१
email ID - collector.osmanabad@maharashtra.gov.in
अ.शा.प.क्र.-२०19/ग्रमक/ 1090
दिनांक : 12 / 07 / 2019

*** शुभेच्छा संदेश***

उस्मानाबाद जिल्ह्यात मागील २ वर्ष कमी पडलेल्या पावसाने भूजल पातळी खालावलेली आणि त्यातच या वर्षी खूपच कमी पाऊस झाल्याने, या वर्षीच्या दुष्काळाची तीव्रता १९७२ च्या दुष्काळा पेक्षा हि भीषण आहे. मराठवाड्यातील उस्मानाबाद सारख्या जिल्ह्यास दुष्काळातून बाहेर काढावयाचे असल्यास विविध प्रकारचे जलसंधारण उपचाराद्वारे पाणी साठवण क्षमता वाढविणे अत्यंत आवश्यक आहेच पण त्याच बरोबर लोकांमध्ये पाणी वापराबाबत जागृती करणे हेहि तितकेच महत्वाचे आहे.

महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या दुष्काळमुक्त महाराष्ट्र अभियान मार्फत उस्मानाबाद जिल्ह्यात दुष्काळ निवरणाचे कार्य सुरू आहे. सुजलाम सुफलाम उस्मानाबाद अभियानातर्गत जलसंधारण विभाग, लघु पाटबंधारे ( जिल्हा परिषद) , कृषि, जलसंपदा, वन व सामाजिक वनीकरण या विभागाद्वारे नालाखोलीकरण, तलावातील गाळ काढणे, सलग समतल चर, शेततळे, वनतळे, शेतीतील बांध बंधिस्ती या प्रकारची विविध उपचार कामे करण्यात आली आहेत.

दि. ०५ ऑक्टोबर २०१८ ते २१ फेब्रुवारी २०१९ या कलावधीत बीजेएस मार्फत २८ जेसीबी व २४ पोकलेण अश्या एकूण ५२ मशीन कार्यरत होत्या त्याद्वारे सर्व विभागाचे मिळून २५४ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर कामे करण्यासाठी ५५, ७३० इतके मशीन तास काम करण्यात आले त्यावर शासनामार्फत इंधनापोटी ३४८. २१ लक्ष इतका निधि खर्च करण्यात आला. त्याद्वारे १३८९. ५१ TCM एवढा पाणी साठा निर्माण झाला.

मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून, उस्मानाबाद जिल्ह्यास भारतीय जैन संघटनेने उपलब्ध करून दिलेल्या मशीनच्या भाड्यासाठी रक्कम रु. ४ कोटी उपलब्ध करून दिले आहेत. दुष्काळ निवारण कामासाठी दि. ०६ मे २०१९ पासून आदर्श आचारसंहिता शिथिल झाल्यानंतर दि. ०८ मे २०१९ रोजी नवीन मशीन भाडेतत्वावर घेण्यासाठी करारनामा करण्यात आला, त्यानंतर मशीन प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर उतरविण्यात येवून ५२ पोकलेन व ०१ जेसीबी मशीन या विविध यंत्रणेच्या कामावर कार्यरत होत्या. त्याद्वारे २०७.८८ TCM एवढा पाणी साठा निर्माण झाला आहे.

**“आता पर्यंत सुजलाम सुफलाम महाराष्ट्र योजनेअंतर्गत जिल्ह्यामध्ये एकूण ४२५ कामे पूर्ण झालेली असून ५३ कामे प्रगतिपथावर आहेत, त्याद्वारे ४०८८.४३ TCM एवढा पाणीसाठा निर्माण झाला असून १६३५ हेक्टर संरक्षित सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे.”**

जिल्हा दुष्काळ मुक्तीसाठी आणि वाढत्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी भविष्यात देखील जिल्ह्यात जास्तीत जास्त प्रमाणात जलसंधरणाची कामे भारतीय जैन संघटना यांच्या मार्फत करण्यात यावीत, सदरील सुजलाम सुफलाम उस्मानाबाद अभियानास माझ्या हार्दिक शुभेच्छा !!

श्रीमती. दिपा मुधोळ मुंडे (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

## Gratitude

**Shri Radhakishan Damani**
*Damani Estates*



Damani Estates aims to take a balanced approach to address social, economic and environmental issues through diverse programs. Bharatiya Jain Sanghatana appreciates and thanks Shri Radhakishan Damani for the support rendered to the Sujalam Suphalam Program.

# Project Progress Footsteps – Osmanabad



**October 2018**

Recruitment of Project staff



**October 2018**

Training of field team



**October 2018**

District level review meetings



**October 2018**

Finalisation of scope of work



**October 2018**

Deployment of earth moving machines



**November 2018**

MoU with machine owners



**November 2018**

Transportation of silt to villager's farmland

## 1. Recruitment of Project staff

After detailed scrutiny of applications and personal interviews, a team of qualified and experienced personnel was recruited for the position of Technical Coordinator and Field Associate in Osmanabad district.

## 2. Training of Project team

For the newly appointed Project team, series of trainings were organised. Induction training conducted for District Manager, Supervisor, Technical Coordinator and Field Associate at BJS office Pune. On 22$^{nd}$ November 2018, training on use of 'Mobile app' was organised. Department of Watershed Development also organised training for Technical Coordinator and Field Associate at Osmanabad office. Again on 4$^{th}$ February 2019, Training on Water Conservation conducted for Supervisors.

## 3. District Level Review Meetings

Weekly Review meetings were conducted by District Administration for planning and roll-out of the project.



Weekly review meeting with District collector, Osmanabad, Smt. Deepa M. Munde, IAS

## 4. Finalisation of Scope of Work by District Administration

A list of identified water structures was prepared by Structure owner department in consultation with Taluka committee and village committee members and approved by District Administration. Administrative sanction was given to 3582 structures.

## 5. Deployment of Earth Moving Machines

In the month of October 2018, heavy earth moving machines were deployed in the district. Community members celebrated commencement of the Sujalam Suphalam project as a festival with the hope that it will rejuvenate water structures.



Celebration by community members on arrival of earth moving machine in village

## 6. Transportation of Silt to Villager's Farmland

Agrarian community were informed about the use of fertile silt to increase the farm productivity. With the desire to get the better productivity in the near future, villagers took the responsibility to transport the silt to their farmlands through tractor and tipper.



Transportation of silt to the farmlands

## Osmanabad Progress so far

| Osmanabad District Summary (Nov'18 to June'19) | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Taluka** | **Number of Structures** | **Silt Excavation in Lakh (Cu.M.)** | **Increase in Water Storage Capacity (in Crore Litres)** |
| 1. | Bhoom | 63 | 18 | 180 |
| 2. | Kalamb | 45 | 9 | 90 |
| 3. | Lohara | 42 | 5 | 50 |
| 4. | Omerga | 58 | 8 | 80 |
| 5. | Osmanabad | 90 | 14 | 140 |
| 6. | Paranda | 26 | 9 | 90 |
| 7. | Tuljapur | 101 | 8 | 80 |
| 8. | Washi | 45 | 8 | 80 |
| **Total** | | **470** | **79** | **790** |



Shirsav Paranda, Osmanabad



Tamalwadi Tuljapur, Osmanabad



Dahithana Paranda, Osmanabad



Dahithana Paranda, Osmanabad

जलसंधारण : १ लाख घनमीटरपेक्षा अधिक कामे मार्गी

# १४ गावे होताहेत 'सुजलाम् सुफलाम्'...

खोलीकरण-रुंदीकरणासाठी जैन संघटनेकडूनही मोठा हातभार



खोलीकरणाची १२ गावांत कामे

---

# जैन संघटनेच्या कामाचा शेतकऱ्यांना लाभ

राहूल मोटे : वालवड येथील जलसंधारण कामास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

वालवड : महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सुजलाम सुफलाम योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांचा फायदा शेतकरी, ग्रामस्थांना होणार असून, याचा त्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आ. राहूल मोटे यांनी केले.

महाराष्ट्र शासन व भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील ५ जिल्हे दुष्काळमुक्त करण्यासाठी सुजलाम सुफलाम योजना हाती घेतली आहे. या अंतर्गत भूम तालुक्यातील वालवड येथील कामाचा आ. राहूल मोटे, माजी आ. ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी तहसीलदार सुरेंद्र देशमुख, तालुका कृषी अधिकारी गणेश दुरंदे, महामुनी, भारतीय जैन संघटनेच्या जिल्हाध्यक्षा कांचनमाला संघवी, सुनिलकुमार डुंगरवाल, जयकुमार जैन, जिल्हा सुपरवायझर वैभव साळुंखे, भूम तालुका समन्वयक श्रीराम पन्हाळकर, क्षेत्र समन्वयक दत्तात्रय पवार आदी उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 2 Dec 07, 2018

---

सुजलाम सुफलाम • भारतीय जैन संघटनेकडून २८ जेसीबी, १९ पोकलेनचा पुरवठा, जिल्ह्यात पाणी साठवणक्षमता वाढणार

# योजनेतून चार महिन्यांत साडेनऊ लाख घनमीटरचे काम

प्रतिनिधी | उस्मानाबाद

शासन व भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या सुजलाम सुफलाम योजनेतून आता कामांना आणखी गती आली आहे. तब्बल ९ लाख ५२ हजार ४३० घनमीटर काम गेल्या चार महिन्यांमध्ये झाले आहे. यासाठी २८ जेसीबी व १९ पोकलेनच्या माध्यमातून काम सुरू असून आतापर्यंत कामासाठी एक लाख ११ हजार ३९० लिटर डिझेल वापरण्यात आले आहे.

जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी भारतीय जैन संघटनेने निवडला आहे. याचा प्रस्ताव शासनाला सादर केल्यानंतर शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागामार्फत जैन संघटनेने दिलेल्या पोकलेन व जेसीबी यंत्रासाठी डिझेल देण्याचे मान्य केले आहे. यातून सुजलाम सुफलाम योजनेचा आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या मार्गदर्शनात आराखड्याला मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात काम सुरू करण्यात आले आहे. यामध्ये आतापर्यंत १३८ कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच ४८ कामे सुरू आहेत. याच्या माध्यमातून नाला खोलीकरण, सलग समतल चर निर्माण, तलावातील गाळ काढणे, नाला खोलीकरण, समतल चर, गाळ काढणे आदी कामे सुरू करण्यात आली आहेत. दि. ५ ऑक्टोबरला कामांचा शुभारंभ झाला होता. हळूहळू यामध्ये गती आणण्यात आली आहे. आतापर्यंत नऊ लाख ५२ हजार ४३० घनमीटर काम झाले आहे. या कामासाठी एक लाख ११ हजार ३९० लिटर डिझेलचा पुरवठा झाला आहे.



## संपूर्ण उन्हाळ्यात होणार ६६०८ कामे

संपूर्ण उन्हाळ्यामध्ये ६६०८ कामांची संख्या ठरवली आहे. यामध्ये ५ कोटी, ७५ लाख, ४९ हजार ४५५ घनमीटर काम करण्याचे उद्दिष्ट जिल्हाधिकारी मुंडे यांनी निश्चित केले आहे. ९६ लाख ८२ हजार तास मशिनच्या साहाय्याने काम करण्यात येणार आहे. सध्या भारतीय जैन संघटनेने २८ जेसीबी, १९ पोकलेन उपलब्ध केले आहेत. संघटना कामाची व्याप्ती वाढवण्यासाठी आणखी यंत्रणा उभी करणार आहे.

## कृषी विभागाची सर्वाधिक कामे

कृषी विभागामार्फत सर्वाधिक कामे करण्यात येणार आहेत. यामध्ये ५३२३ कामांचा समावेश आहे. लघुसिंचन ३८२, लघुपाटबंधारे ५३९, सामाजिक वनीकरण २, वनविभाग ९५३, जलसंपदा विभागाची २२० कामे केली जाणार आहेत. अद्याप यापैकी ३७०५ कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. अन्य कामांना मंजुरी लवकरच देण्यात येणार आहे.

## जलसाठा होणार

*■ जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात व भारतीय जैन संघटनेच्या विशेष कक्षाच्या निरीक्षणात जिल्ह्यात कामे सुरू आहेत. संघटनेने उस्मानाबाद जिल्हा दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. पाऊस पडल्यावर या कामांचा मोठा फायदा होईल."*

नितीन वटटकर, जिल्हा समन्वयक, सुजलाम सुफलाम योजना.

---

सुजलाम् सुफलाम् उस्मानाबाद जिल्हा करण्यासाठी शासन-प्रशासनासह जैन संघटना सरसावली

# ६६०८ कामातून सव्वासात कोटी घनमीटर काम करणार

• जैन संघटनेचे अध्यक्ष मुथ्था यांची माहिती • पालकमंत्री खोतकरांसह विविध राजकीय पक्षाच्या लोकप्रतिनिधींची उपस्थिती

पुण्य नगरी | वृत्तसेवा

**उस्मानाबाद : जिल्ह्याची दुष्काळाची ओळख पुसून टाकण्यासाठी व जिल्हा 'सुजलाम सुफलाम' करण्यासाठी भारतीय जैन संघटनेच्या वतीने उस्मानाबाद जिल्ह्यात ६ हजार ६०८ कामे हाती घेण्यात आली आहेत. सदरील कामासाठी भारतीय जैन संघटना मोफत मशीनरीचा पुरवठा करणार आहे तर त्यासाठी लागणारे इंधन हे शासनाकडून पुरविले जाणार आहे. त्यामुळे या कामाच्या माध्यमातून जिल्ह्यात ७ कोटी १६ लाख २४ हजार ७७६ घनमीटरचे पाणलोटचे काम होण्यास मदत होणार असल्याची माहिती भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतीलाल मुथ्था यांनी उस्मानाबादेत शुक्रवारी (दि.२४) पत्रकार परिषद व कार्यशाळेत दिली.**



पुढे बोलताना ते म्हणाले, भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात दुष्काळमुक्तीसाठी पाणलोट क्षेत्र विकासाची कामे करण्यात आली. त्याठिकाणी काम करण्यात यशस्वी झाल्यामुळे हाच प्रयोग लातूर, उस्मानाबाद वाशिम व अकोला येथेही पाणलोट विकासाची कामे करून १५ जूनपर्यंत हे पाचही जिल्हे दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. जैन संघटना या कामासाठी विनामुल्य जेसीबी व पोकलेन मशिन्स उपलब्ध करून देणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून कृषि विभागास ५ हजार २३५ कामे, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग २७८ कामे, जिप लघुपाटबंधारे विभाग ५३३, सामाजिक वनीकरण २, वनविभाग ११२, जलसंपदा विभाग ४४८ अशी एकूण ६ हजार ६०८ कामाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी जैन संघटना ही ५० जेसीबी मशीन मोफत देणार आहे. यासाठी शासनाकडून इंधनाचा संपूर्ण खर्च करण्यात येणार आहे. यातून ७ कोटी १६ लाख २४ हजार ७७६ घनमीटर काम होणार आहे. उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यातील भूकंपाच्या आपत्तीला ३० सप्टेंबर रोजी २५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यामुळे ▸▸ पान३वर

**तालुकानिहाय कामांची संख्या**

उस्मानाबाद जिल्ह्यात सुजलाम सुफलाम महाराष्ट्र योजनाअंतर्गत उस्मानाबाद तालुक्यात ७४९, तुळजापूर ५९५, उमरगा ७७०, लोहारा ३९६, भूम १६६८, परंडा ९९४, कळंब १०१८, वाशी ४१८ अशी एकूण ६ हजार ६०८ कामे आहेत.









BJS
Bharatiya Jain Sanghatana

**Head Office:**
Level 3, Muttha Chambers II,
Senapati Bapat Road,
Pune 411016,
Maharashtra,
India.

020 66050000

info@bjsindia.org

www.bjsindia.org

www.facebook.com/bjsindia